## लेखा परिक्षण अहवाल आक्षेप परिच्छेद पडताळणी शिबीर दि.०१/०९/२०२३ चे इतिवृत्त

लेखा परिक्षण अहवाल आक्षेप परिच्छेद पडताळणी शिबीर-१, दिनांक ०१/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, नागपूर यांचे सभागृह येथे पार पडले त्याबाबतचे इतिवृत्त.

लेखा परिक्षण अहवाल आक्षेप परिच्छेद पडताळणी शिबीराकरीता मा. नियंत्रक यांच्या परवानगीने खालील अधिकारी/ कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली होती.

१) श्री. जी.एल.नेमाडे, सहायक लेखाधिकारी

२) श्री. एम.एन.ठोसरे, सहायक लेखाधिकारी (कंत्राटी)

३) श्री.आर.एम. राऊत, वरिष्ठ लिपीक

शिबीरात मा. नियंत्रक हे उपस्थित होते व त्यांचे स्वागत वेतन व लेखाधिकारी, नागपूर यांच्या मार्फत करण्यात करण्यात आले व त्यानंतर मा. नियंत्रक यांनी उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना आता पर्यंतच्या लेखा परिक्षण अहवाल व त्यामध्ये निकाली निघालेले परिच्छेद व प्रलंबित परिच्छेद याबाबत थोडक्यात माहिती देऊन लेखा परिच्छेद आक्षेपाचे अनुपालन कसे सादर करावे याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच सदर शिबीरामध्ये योग्य असलेले परिच्छेद हे अंतिम मान्यता नसून यानंतर हे योग्य परिच्छेद लेखा आक्षेप पुर्तता समिती मध्ये ठेवण्यात येतील. या समितीमध्ये सदर अनुपालनांना मंजुरी घेऊन, अंतिमतः सर्व मंजूर परिच्छेद कार्यकारी परिषदेमध्ये ठेवून निकाली काढण्यात येतात असे मा.नियंत्रक यांनी सुचना दिल्या व शिबीरात कार्यालय प्रमुख यांनी उपस्थित राहण्याबाबत सुचित केले.

लेखा परिक्षण अहवाल आक्षेप परिच्छेद पडताळणी शिबीरामध्ये नागपूर विभागातील एकूण २६ कार्यालयानी/ योजनांनी सहभाग नोंदवून लेखा परिक्षण अहवालातील आक्षेपीत एकूण १०१ परिच्छेद पडताळणी करीता सादर केले होते. या १०१ आक्षेपीत परिच्छेदांची शिबीरात पडताळणी केली असता एकूण १५ परिच्छेदांचे योग्य अनुपालन होते व उर्वरीत ८६ परिच्छेदांच्या अनुपालनामध्ये त्रुटी होत्या. त्या त्रृटयांची पुर्तता करुन अनुपालन सादर करुन ते फेर तपासणी करीता सादर करण्यात यावे असे संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांना निर्देश शिबीरा मार्फत देण्यात आले. २६ कार्यालय/ योजना पैकी लेखा परिक्षण अहवाल आक्षेप परिच्छेदांचे योग्य अनुपालन ६ कार्यालयानी/ योजनांनी सादर केले.

मागील पानावर........

योग्य अनुपालन सादर केलेल्या कार्यालयाबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | सादर केलेले एकूण परिच्छेद | योग्य परिच्छेद | अयोग्य परिच्छेद |
|---|---|---|---|---|
| १ | वेतन व लेखाधिकारी, नागपूर | ०४ | ०३ | ०१ |
| २ | कृषि महाविद्यालय, गडचिरोली | ०५ | ०१ | ०४ |
| ३ | कृषि संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालय, नागपूर | ०१ | ०१ | ०० |
| ४ | महाराजबाग गार्डन, कृषि महाविद्यालय, नागपूर | ०२ | ०२ | ०० |
| ५ | के.व्ही.के. साकोली | ०८ | ०५ | ०३ |
| ६ | कृषि तंत्र विद्यालय, सावंगी | ०५ | ०३ | ०२ |
| | एकूण परिच्छेद | २५ | १५ | १० |

सर्वात शेवटी मा.नियंत्रक यांनी लेखा परिक्षण अहवाल आक्षेप परिच्छेद पडताळणी शिबीर हे दर तीन महिण्याने ठेवण्यात येऊन सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी जास्तीत जास्त परिच्छेदांचे योग्य अनुपालन दस्ताऐवजसह सादर करण्यातस्तव सुचना देवून त्रुटीत असलेल्या परिच्छेदांचे अनुपालन नियंत्रक कार्यालयासा सादर करण्यास्तव आदेश आदेशीत केले.

मा. नियंत्रक यांच्या परवानगीने शिबीराची समाप्ती करण्यात आली.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

जा.क्र.अप्रवि/अलेप/शिबीर-१/इतिवृत्त/ ११०० /२०२३.
दिनांक:१२ /०९/२०२३.

प्रत : १) सर्व आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., नागपूर विभाग.
२) मा.कुलसचिव, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहितीस्तव.
३) मा.कुलगुरु, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांचे स्वीय सहाय्यक यांना मा.कुलगुरु महोदय यांच्या माहितीस्तव.
४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

Officer In Charge, Agricultural Research Station ... Inward No. 256 Dt. 12/9/23